मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक २० ऑक्टोंबर २०२३। पान १

# पिंपरी चिंचवडच्या विकासासाठी मीच ‘कटिबद्ध’!

## अजितदादांनी साधला रोहित पवारांवर निशाणा..!

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड शहरामध्ये काका आणि पुतणे म्हणजेच अजितदादा पवार आणि रोहित पवार यांच्यातील संघर्ष सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची ओळख अजितदादांचा बालेकिल्ला म्हणून आहे, आणि हाच बालेकिल्ला काबीज करण्यासाठी शरद पवार गटाचे नेते, आमदार रोहित पवार हे वारंवार पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर येत आहेत. असं असताना आता अजित पवार यांनीच थेट रोहित पवार यांना लक्ष करत त्यांचं नाव न घेता टीका केली आहे. अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या गणपती देखावा आणि गौरी सजावट स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात बोलत होते.

यावेळी आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, कविता आल्हाट, संजोग वाघेरे, विलास लांडे, नाना काटे, राजू मिसाळ, मंगला कदम, वैशाली काळभोर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते.यावेळी अजित पवार म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहरात काहीजण येऊन वेगळ्या प्रकारचं वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिकांना माहित आहे, की स्वर्गीय रामकृष्ण मोरे यांच्यानंतर मीच पिंपरी-चिंचवड शहरात लक्ष घातलं. वेळप्रसंगी कठोर निर्णय घेतले. शहरातील विकासासाठी मी कटिबद्ध राहिलो. शेवटच्या घटकाचा विचार करून मी निर्णय घेतले. पिंपरी-चिंचवड शहराचा विकास हा १९९२ पासून आज तागायत करत आलो आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून अनेकांना महत्वाची पदे दिली. असे अजित पवार यांनी म्हटले आहे. पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव आणि गौरी गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण पवार यांच्या हस्ते आज (शुक्रवारी) आकुर्डीत झाले.

शहराध्यक्ष अजित गव्हाणे, आमदार अण्णा बनसोडे, माजी विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे, मंगला कदम, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राजू मिसाळ, श्याम लांडे, नारायण बहिरवाडे आदी उपस्थित होते.

स्पर्धेमुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यास चालना मिळणार आहे. सध्या राज्यात सगळीकचे प्रदूषण वाढले आहे. त्याला आपण सर्वजण जबाबदार आहेत. जबाबदारीचे भान दुर्दैवाने सर्वांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे वेगवेगळे आजार येत आहेत.

रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे काळजी घेतली पाहिजे. सर्वांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. महायुती सरकारमध्ये काम करतानाही सर्व जाती-धर्माच्या लोकांना न्याय मिळाला पाहिजे अशी माझी भूमिका आहे. कोणालाही भय वाटले नाही पाहिजे. विचारांशी प्रतारणा होणार नाही. ध्येय-धोरणांशी तडजोड होणार नाही. यशवंतराव चव्हाण यांचा विचारांचा, विकासाचा, सुसंस्कृत विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम यापुढील काळात केले जाईल, असेही ते म्हणाले.




### डीजेविना उत्सव साजरा करा

» लेजर लाईट आणि डीजेच्या आवाजामुळे लोकांना मोठा त्रास होत आहे. काहींना बहिरेपणा, हार्ट अॅटक आला आहे. लेझर बीममुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा होते. कानाला इजा होते. लोकांना त्रास होतो. पण कोण कोणाचं ऐकणार? लेजर लाईट आणि डीजे विना गणेशोत्सव, इतर उत्सव साजरे करण्याचा संकल्प करावा. अन्यथा कडक कारवाई करायला भाग पाडू नका, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

# ‘ओला’, ‘स्विगी’च्या कर्मचाऱ्यांचा २५ ऑक्टोबरला बंद!

## रिक्षा व टॅक्सी प्रमाणे कॅब्सचे सुद्धा दर निर्धारित करण्याची मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील ‘ओला’, ‘उबेर’, ‘स्विगी’, ‘झोमॅटो’, ‘पोर्टर’, ‘अर्बन’ यासारख्या मोबाईल अॅप्लिकेशन वर काम करणारे कॅब, रिक्षाचालक व बाईक डिलिव्हरी युवक- युवती हे २५ ऑक्टोबरला एक दिवसीय सामूहिक लाक्षणिक बंद पाळणार आहेत. येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये कायदे संमत करून कष्टकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी हा बंद पुकारण्यात येणार आहे, अशी माहिती बघतोय रिक्षावाला संघटनांचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी दिली. ड्रायव्हरला किंवा डिलिव्हरी बॉईजला कुठल्याही प्रकारचा ऑनलाइन किंवा ऑफलाईन सपोर्ट नसणे.कस्टमरने केलेल्या तक्रारीची शहानिशा न करता परस्पर ‘आयडी’ ब्लॉक करणे किंवा मोठा दंड आकारणे. ब्लॉक केलेला ‘आयडी’ चालू करण्यासाठी दलाल लोकांमार्फत मोठी रक्कम उकळणे.ऑर्डर किंवा राईड देताना प्रत्यक्षात जास्त अंतर असताना, मोबाईलवर कमी अंतर दाखवणे व कमी मोबदला देऊन फसवणूक करणे व याबाबत दाद मागण्यासाठी कुठलीही यंत्रणा नसणे.कंपन्यांच्या एकमेकांशी होत असलेल्या वाढत्या स्पर्धेमुळे आठ-नऊ रुपये प्रति किलोमीटर दरावर कॅब चालकांना काम करण्यास भाग पाडणे.पर्यायाने रिक्षाचालकांचा व्यवसाय मोडकळीस आणणे.टुरिस्ट बुकिंगसाठी बेकायदेशीरपणे पांढऱ्या नंबर प्लेटच्या गाड्या वापरून शासन, इन्शुरन्स कंपन्या तसेच प्रवाशांची फसवणूक करणे. पिवळ्या नंबरप्लेटच्या कायदेशीर व्यवसाय करत असणाऱ्या वाहन चालकांच्या व्यवसायावर गदा आणणे. वाढत्या बेरोजगारीमुळे मोठ्या संख्येने युवक अशा प्रकारच्या मोबाईल कंपन्यांच्या अॅप्सवर रोजगाराच्या शोधामध्ये काम करण्यास सुरुवात करतात. परंतु, या कंपन्या दिवसागणिक कष्टकऱ्यांच्या उत्पन्नावर टाच आणत आहेत. सरकार व प्रशासनाकडे मागण्या - केंद्र सरकारच्या सोशल सिक्युरिटी कोड २०२० या कामगार संहितेला अपेक्षित असल्याप्रमाणे, तसेच राजस्थान सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रात सुद्धा गिग वर्कर्स रजिस्ट्रेशन अँड वेल्फेअर अॅक्ट (गिग कामगार नोंदणी व कल्याणकारी कायदा) संमत करावा व या कंपन्यांकडून जी ‘गिग’ कामगारांची पिळवणूक चालू आहे. त्यापासून कामगारांना संरक्षण प्रदान करावे.

# पिंपरी- चिंचवडमध्ये अजित पवारांच्या कार्यक्रमाला नाट्यगृह निम्मे रिकामे?

## अजित पवार यांनी वेळेत उपस्थिती लावत कार्यक्रमाला हजर

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी घेतलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पहिल्यांदाच बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पिंपरी- चिंचवड शहरात आले आहेत. अजित पवारांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या गणेशोत्सव देखावे आणि गौरी सजावट स्पर्धेच्या बक्षीस वितरण होणार आहे. अजित पवार यांनी वेळेत उपस्थिती लावत कार्यक्रमाला हजर झाले पण निगडीत ग.दि.मा नाट्यगृह निम्मे रिकामे होते. यामुळे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या कार्यक्रमाला आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, माजी उपमहापौर राजू मिसाळ, नाना काटे यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा पिंपरी- चिंचवड दौरा आहे. त्यांनी वाकड, हिंजवडी येथील खासगी कार्यक्रमाला हजेरी लावून फिती कापल्या. मग, ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या बक्षीस वितरण समारंभास उपस्थित राहिले. पण, यावेळी कार्यक्रमस्थळी ८०० आसन क्षमता असलेले ग.दि.मा नाट्यगृह हे निम्मे रिकामे बघायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या स्पर्धेत शेकडो मंडळांनी सहभाग नोंदवला पण बक्षीस वितरण समारंभास मात्र त्यांनी पाठ फिरवली आहे. एकीकडे पिंपरी- चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला मानला जातो. तर दुसरीकडे नाट्यगृह निम्मे रिकामे असल्याचं निदर्शनास आले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पोलिस देखील हजर होते, तगडा बंदोबस्त होता.



# आ.शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त जोरदार फलकबाजी!

## शुभेच्छा फलकांवर आमदार शेळके यांचा 'भावी मंत्री' म्हणून उल्लेख

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण मावळ तालुक्यात जोरदार फलकबाजी करण्यात आली आहे. अनेक शुभेच्छा फलकांवर आमदार शेळके यांचा 'भावी मंत्री' म्हणून उल्लेख करण्यात आल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय झाला आहे. मदन बाफना, बाळा भेगडे यांच्यानंतर मावळला तिसऱ्यांदा मंत्रिपदाची संधी मिळणार का? याविषयी तालुक्यात उत्सुकता वाढली आहे. आमदार शेळके हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जातात. नाट्यपूर्ण घडामोडींनंतर अजितदादांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर शेळके समर्थकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढल्या असून त्यांना मंत्रिपदाचे वेध लागले आहेत.

भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मावळ तालुक्यात प्रचंड मताधिक्याने विजय मिळवत आमदार शेळके यांनी अजितदादांचा विश्वास संपादन केला. महाविकास आघाडीचे सरकार असताना अजितदादांनी आमदार शेळके यांना सदैव झुकते माप दिले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर आमदार शेळके समर्थकांमध्ये काहीशी चिंतेचे वातावरण होते. शिंदे- फडणवीस सरकारला पाठिंबा देत अजितदादा उपमुख्यमंत्री झाल्याने शेळके समर्थकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आगामी मंत्री मंडळ विस्तारात आमदार शेळके यांच्या गळ्यात नक्की माळ पडेल, असा दावा शेळके समर्थक करीत आहेत. आमदार शेळके यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तालुक्यात ठिकठिकाणी शुभेच्छा फलक लावण्यात आले आहेत. (डींपळश्र ड्हशश्रज्ञश) त्याद्वारे शेळके यांचा 'भावी मंत्री' असा उल्लेख करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी अशा महायुतीतर्फे आगामी निवडणूक लढवली जाण्याच्या शक्यतेने तालुक्यातील भाजप कार्यकर्ते मात्र अस्वस्थ झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार शेळके यांना मंत्रिपद देण्याबाबत भाजपा पक्षश्रेष्ठी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# ललितला केमिकल इंजिनिअर लोहारेने दिला मेफेड्रॉनचा फॉर्म्युला!

## संजय राऊतांचा महाराष्ट्र सरकारवर हल्लाबोल

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

केमिकल इंजिनिअर अरविंदकुमार प्रकाशचंद्र लोहारे याने ललित पाटील याला येरवडा कारागृहात मेफेड्रॉन (एमडी) तयार करण्याचा फॉर्म्युला दिला. तो फॉर्म्युला ललितने भूषणला दिल्यानंतर त्यांनी नाशिकमध्ये मेफेड्रॉनचा कारखाना सुरू केला. त्यातून अमली पदार्थ तस्करीचे साम्राज्य निर्माण केल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी न्यायालयात दिली. चाकण येथील अमली पदार्थ विक्रीच्या गुन्ह्यात ललितला अटक केली होती. त्यानंतर ललित आणि लोहारे यांची येरवडा कारागृहात भेट झाली. त्यावेळी लोहारे याने ललितला मेफेड्रॉन तयार करण्याचा फॉर्म्युला दिला. लोहारे सध्या येरवडा कारागृहात आहे. त्यालाही आता या गुन्ह्यात वर्ग करून चौकशी करण्यात येणार आहे. ललित सध्या मुंबई पोलिसांच्या कोठडीत आहे. दरम्यान, ललितचा भाऊ भूषण पाटील आणि अभिषेक बलकवडे यांची पोलिस कोठडीची मुदत आज संपत आली होती. त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींनी केलेला गुन्हा गंभीर असून, गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी भूषण आणि बलकवडेच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सहायक सरकारी वकील निलीमा यादव- इथापे यांनी केली. न्यायालयाने ती मान्य करत दोघांच्या पोलिस कोठडीत २२ ऑक्टोबरपर्यंत वाढ केली. तपासादरम्यान अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यात ललितचे आणखी दोन साथीदार निष्पन्न झाले आहेत. झिशान शेख आणि रोहन ऊर्फ गोलू अन्सारी अशी त्यांची नावे आहेत. ते अनुक्रमे येरवडा आणि तळोजा कारागृहात आहेत. याबाबत त्यांच्याकडेही तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नाशिकमध्ये एमडी ड्रग्स कारखान्याचा सेटअप उभारण्यासाठी अन्सारीने ललित पाटील याला मदत केली होती. तसेच अन्सारी हा ड्रग्सची मोठ्या प्रमाणात विक्री करत होता. नाशिकमधील कारखाना बांधायला गोलूने मदत केल्याची माहिती आहे. या प्रकरणामध्ये रेहान शेख अन्सारी उर्फ गोलू याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ड्रग्जचा कारखाना उभारण्यासाठी रेहान शेखने ललित पाटीलला मदत केल्याची माहिती मिळत आहे. ड्रग्सची विक्री, त्यातून येणारे पैसे आणि कारखाना या गोष्टींची होती जबाबदारी रेहान शेखकडे होती. पुणे पोलिसांनी मुंबई पोलिसांकडून रेहान अन्सारीचा ताबा घेतला आहे. ललित पाटील प्रकरणात रेहान अन्सारीदेखील आरोपी आहे. त्याला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून २० ऑगस्ट रोजी अटक केली होती. दरम्यान, ललित पाटील ड्रग्ज प्रकरणी ठाकरे गटाच्या वतीने नाशिकमध्ये मोर्चा काढण्यात आला होता. खासदार संजय राऊत यांच्या नेतृत्वात हा मोर्चा संपन्न झाला. राऊत यांनी महाराष्ट्र सरकारवर हल्लाबोल करत जोरदार टीकास्त्र सोडलं.



### पोलिसांची भूमिका संशयास्पद

» ललित पाटील ससून ड्रग्ज प्रकरणी पोलिसांचा कारवाईचा तडाखा सुरूच आहे. ललित पाटीलला पळून जाण्यास मदत केलेल्या दोन मैत्रिणींना कालच पुणे पोलिसांनी थेट नाशिकमध्ये जाऊन अटक केली होती. त्यानंतर आता आणखी एका व्यक्तीला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सचिन वाघ असं अटक करण्यात आलेल्याच नाव आहे. अटक केलेला हा ललित पाटील याचा कारचालक आहे. बंगळुरूत ललित पाटील याचा मित्र सचिन वाघ हे दोघे सोबत असल्याचा पोलिसांना संशय आहे. आता मुंबई पोलिसांनी ललित पाटील याचा मित्र असलेला त्याच्या कारचालकाला काल रात्री उशीरा बेड्या ठोकल्या आहेत.

# महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचा जागर!

## स्मारकाचे काम तातडीने सुरु करा: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भिडे वाड्याचे स्मारकात रूपांतर करण्याच्या दृष्टीने कार्यवाहीवर भर दिला आहे. न्यायालयाने भूसंपादनासाठी पूर्वीचेच निवाडे (अवॉर्ड) कायम ठेवले असले, तरी मोबदला २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार द्यावा लागणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, महापालिकेने पूर्वीच तयार केलेल्या प्राथमिक संकल्पचित्रानुसार पूर्वतयारी सुरू केली आहे. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. त्याचे स्मारक करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र, त्याला जागामालक व पोटभाडेकरूंनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, उच्च न्यायालयाने ही याचिका निकाली काढत महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. महापालिकेने यापूर्वी केलेल्या निवाड्यानुसारच जागेचा मोबदला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. मात्र, हे आदेश देताना २०१३ मध्ये नव्याने आलेल्या भूसंपादन कायद्यानुसार फरकाची रक्कमही द्यावी, असेही आदेशात नमूद केले आहे. यासाठी महापालिकेची आधीपासूनच तयारी आहे. याशिवाय कोणी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यास महापालिकेने कॅव्हेटही दाखल केले आहे. दरम्यान, निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्मारकाचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेश महापालिका व जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार जागेचे नव्याने मूल्यांकन केले जात आहे. यानंतर भूसंपादनासाठी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली जाईल. नोटीसीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे प्रत्यक्ष भूसंपादन केले जाईल, अशी माहिती महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. भिडे वाडा येथील स्मारकाचा प्राथमिक संकल्पचित्र महापालिका प्रशासनाने यापूर्वीच तयार करून ठेवले आहे. सुमारे २ हजार चौरस फुटांचा हा कौलारू वाडा पूर्वीप्रमाणेच दुमजली स्वरूपात उभारला जाईल.



# खडकवासला ते फुरसुंगी बोगद्यासाठी जलसंपदा विभागाकडे निधी नाही!

## अजित पवारांनी पर्याय सांगितला टीडीआरचा पर्याय

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** खडकवासला ते फुरसुंगीपर्यंतच्या २८ किलोमीटरच्या बोगद्यासाठी जलसंपदा विभागाकडे निधी नाही. त्यामुळे पुणे महापालिकेने या दरम्यानची जागा ताब्यात घेऊन त्याचा टीडीआर द्यावा. टीडीआर दिल्यास त्याची मोठी रक्कम मिळू शकते. त्यातून बोगद्याचे काम होऊ शकते असा जलसंपदा विभागाने प्रस्ताव दिल्याची माहिती पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. याबाबत दसऱ्यानंतर बैठक घेऊन माहिती घेऊ असेही ते सांगायला विसरले नाहीत. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. त्यावेळी खडकवासला ते फुरसुंगीच्या बोगद्याचे पुढे काय असे



विचारता अजित पवार म्हणाले, 'खडकवासल्याचे पाणी फुरसुंगीला कालव्याद्वारे जाते. पण त्याच ठिकाणी बोगदा केला तर अडीच ते तीन टीएमसी पाणी वाचू शकते. खडकवासला ते फुरसुंगीपर्यंतचा बोगदा करण्यासाठी जलसंपदा विभागाकडे निधी नाही. हा कालवा शहरातून गेला आहे. पाणी त्यातून वाहते आहे. दोन्ही बाजूने रस्ते असून काही जागा शिल्लक आहे. खडकवासला ते फुरसुंगीपर्यंतची जागा पुणे महापालिकेने ताब्यात घ्यावी आणि त्याबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) द्यावा, असा प्रस्ताव जलसंपदा विभागाने दिला आहे. 'उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर बैठक घेतली होती. अशा गोष्टी फार नियमावर बोट ठेऊन करू नका, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते. प्रकल्पाच्या किंमती वाढत आहेत. यात नगरविकास, जलसंपदा, महसूल विभागांचा संबंध येत असल्याने त्यांनी सकारात्मकता दाखविली आहे. दसऱ्यानंतर त्याबाबत मी बैठक घेऊन त्याचा आढावा घेईन. त्यावेळी जलसंपद विभाग कोणत्या निर्णयापर्यंत आला आहे याची माहिती घेईल,' असेही अजित पवार यांनी सांगितले. ललित पाटील ड्रग्ज प्रकरणात अजित पवार हे प्रथमच माध्यमांशी बोलले. त्यावेळी ससूनच्या अधिष्ठातावर कारवाईबाबत बोलण्याचे त्यांनी टाळले. ते म्हणाले, यासंदर्भात पोलीस चौकशी करीत आहेत. त्याला अटक करून न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीनंतर वस्तुस्थिती समोर येईल. या प्रकरणात आरोपीनेच आरोप केले आहेत, त्याबद्दल चौकशी करून काय झाले, कसे झाले, अशा बऱ्याच गोष्टी समोर आल्या आहेत. गृहमंत्रालयाने ही बाब गांभीर्याने घेतली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी काही मंत्र्यांवर आरोप केले आहेत, त्याबाबत 'विरोधी पक्ष आता सत्ताधाऱ्यांवर आरोप करत आहेत. त्यातून काहींनी अब्रू नुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशारादेखील दिला आहे. या सर्व बाबींची चौकशी करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर काय नेमके घडलेले आहे. ते आपल्या सर्वांच्या समोर येईल,' असेही ते म्हणाले.

# कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामात अडथळे!

## स्त्यासाठीच्या भूसंपादनाला अद्यापही मिळालेली नाही गती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी कात्रज-कोंढवा रस्त्यासाठीच्या भूसंपादनाला अद्यापही गती मिळालेली नाही. या रस्त्यासाठी महापालिका आयुक्तांपासून प्रशासन प्रयत्नशील असले, तरी १३८पैकी अवघ्या सातच मालमत्तांचे संपादन करण्यात पालिकेला यश आले आहे. महापालिका प्रशासन उर्वरित जागामालकांशी चर्चा करून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात आहे. कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण भूसंपादनाअभावी रखडले आहे. मूळ प्रस्तावानुसार हा रस्ता ८४ मीटर रूंद होता. मात्र, भूसंपादनासाठी लागणारा खर्च वाढत असल्यामुळे महापालिकेने आता या रस्त्याची रुंदी ५० मीटरच करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेला रस्त्याच्या भूसंपादनासाठी २८० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. उर्वरित ८० कोटी रुपये महापालिका खर्च करणार आहे. पुण्याचे पालकमंत्रिपद स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिल्याच जिल्हा आढावा बैठकीमध्ये कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाचा आढावा घेतला होता. भूसंपादन वेगाने व्हावे, याबाबत पवार यांनी महापालिका प्रशासनाला सूचनाही केल्या.



दीड महिन्यापूर्वी महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनीही या रस्त्याचे काम आणि भूसंपादनासंदर्भात प्रत्यक्ष पाहणी केली होती. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही या रस्त्याला भेट देत पाहणी करून प्रशासनाला सूचना दिल्या होत्या; तसेच अतिरिक्त वाहतूक वॉर्डनही उपलब्ध करून दिले होते. यानंतर दीड महिन्यामध्ये अडीच हजार चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात आले. सात मिळकतधारकांकडून हे संपादन करण्यात आले आहे. अद्याप १३८ मिळकतींचे संपादन बाकी आहे. भूसंपादनासंदर्भात या जागामालकांशी चर्चा सुरू असल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाला वेळ लागणार आहे. मात्र, या रस्त्यावर सातत्याने होणारे अपघात आणि वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिका; तसेच वाहतूक पोलिस विविध पर्यायांचा विचार करत आहे. यातूनच गर्दीच्या वेळी या रस्त्यावरून होणारी जड वाहतूक थांबविण्याचा पर्यायही पुढे आला असून, तशा सूचना पालकमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. पालकमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीतही चर्चा झाली.

### रोख मोबदला हीच अडचण

**» कात्रज कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणात भूसंपादन हीच प्रमुख अडचण आहे. येथील बहुसंख्य जागामालक रोख मोबदल्यासाठीच अडून बसले आहेत. महापालिकेने टीडीआर, एफएसआय व अन्य पर्यायांची तयारी दर्शवली आहे. मात्र, भूसंपादनाचे गाडे रोख मोबदल्यावरच अडल्याचे चित्र आहे.**